# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २२/१०/२०२२ (शनिवार)**

**(दुपार)**

---

### गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत १२ कि.मी अंतरावरील कोलवासरी गोडेगाव येथे दिनांक २०/१०/२०२२ चे ११.०० वा. दरम्यान मौजा येसंबा नांदगाव ता. पारशिवनी येथील कोलवासरी मध्ये कोळसा साफ करतांना निघणाऱ्या धुळीचे कण कोलवासरी परिसरात असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतामध्ये जाते. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांनी नुकसान भरपाई मिळविण्याकरीता कंपनी कडे तसेच उपविभागीय अधिकारी रामटेक व तहसिलदार पारशिवनी यांना निवेदने दिलेले होते. तसेच केलेल्या नुकसानीचे दरास कंपनीने आक्षेप घेतलेला होता. त्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचे प्रकरण प्रलंबीत राहीले होते. त्यामुळे वराडा गावचे सरपंच व २० ते २५ पुरूष कंपनीचे गेटवर जमा झाले व येणाऱ्या जाणाऱ्या टिप्पर व रहदारीस अटकाव करून व कोलवासरी समोर ठिया मारून बसले होते. काही व्यक्तीची नावे बंदोबस्ताच्या ठिकाणी हजर असलेल्या पोलीसांनी नावे नोंद करून सदर चा गुन्हा दाखल करून तपासात घेण्यात आला.

आरोपी क्र. १) विद्याताई दिलीप चिखले, २) राजेश तेजरामजी खिरेकार, ३) प्रफुल शेषराव भालेराव, ४) संदीप धनराज पांडे, ५) देवाजी श्यामराव शेळके, ६) सुधाकर तनुबानी खेरेकार, ७) सुनील पांडुरंग वाळई, ८) अतुल धोंडीबाजी चरडे, ९) सचीन संपत चिखले, १०) हिरालाल तेजरामजी खेरेकार, ११) राहुल शेषराव भालेराव, १२) रविन्द्र पांडुरंग वाडई, १३) दिलीप संपतराव चिखले सर्व रा. वराडा, १४) प्रमोद सोमाजी गिरे, १५) मारोती कवडुजी लसुंते, १६) राकेश खेशाल बोरले, १७) मारोती पंकुजी कोटरूले, १८) मनोरंमा धोडीबाजी ठाकरे, १९) रेखा रामदास कावळे, २०) छाया गोविंदरावजी माहुरे, २१) दुर्गाताई रामदास काळे, २२) लिलाबाई खुशाल बोरले, २३) विद्या कैलाश गिरे, २४) कांताबाई गजानन ठाकरे, २५) दुर्गाबाई मारोती कोठरूंगे, सर्व रा. वराडा, २६) शालुबाई तेजरामजी खिरेकार रा. वराडा यांचर नावे नोंद करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— योगेश बाबुराव लोणकर वय ४२ वर्ष रा. सहकार नगर वार्ड क्र. ३ नंदनवन नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीतांविरुध्द कलम १४१,१४३,३४१,३४२ भादंवी सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार जयलाल सहारे मो.क्र. ९३०९९६६३९२ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. बोरी** :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील वर्धा ते नागपूर उडाणपुल, रा. रूईखैरी येथे दिनांक २१/१०/२२ चे १८.२० वा. सुमारास एमएच—१३/सीयु— ९८२३ क्रमांकाचा ट्रकचा चालक **आरोपी नामे— बसप्पा जेसप्पा कोळी(मृतक), वय ५० वर्ष, रा. आडीव ता. पंढरपुर महाराष्ट्र** याने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव निष्काळजीपणे चालवुन उडानपुलावरील लोखंडी ॲगला धडक दिली. त्यामुळे ट्रक पलटी झाल्याने आरोपी चालक कॅबीनचे खाली दबुन स्वत:चे मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— संगीता अरूण तिमांडे, वय ४१ वर्ष, रा. रूईखैरी ता.जि. नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि ठाकुर मो.क ८३५५९४७४७३ या करीत आहे.

## निष्काळजीपणामुळे मृत्यु

**पो.स्टे. देवलापार** :— अंतर्गत ११ कि. मी. अंतरावरील मौजा खनोरा शेतशिवार येथे दिनांक २१/१०/२२ चे ०९.०० वा. ते ०९.३० वा. सुमारास आरोपी नामे— तेजराम शालीकराम बावीसताले, वय ७४ वर्ष, रा. खनोरा याने आपले स्वताचे धानाचे शेतीत करंट लावल्याने कोणीही मरू शकतो याची जाणीव असतांना सुद्धा त्याने जाणीवपुर्वक हरीचंद बावीसताले यांचे खाजगी तलावाचे बाजूला असलेल्या आपल्या शेतामध्ये धानाच्या बांधीला अवैद्यरित्या जी आय तारेचा करंट लावल्याने **प्रभाकर भैयालाल सुहागपूरे(मृतक) वय ५१ वर्ष रा. खनोरा ता. रामटेक** याचे उजव्या पायाला करंट लागून मरण पावला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— रितेश प्रभाकर सुहागपूरे, वय ५१ वर्ष रा. खनोरा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम ३०४ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि लक्ष्मी घोडके मो क. ८८३०६१४९५० या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**